# मुंबईमधील बलात्कार गुन्ह्यांमध्ये 105 टक्क्यांनी वाढ? प्रजा फाउंडेशनच्या अहवालावर मुंबई पोलिसांचा आक्षेप

Praja Foundation Report : प्रजा फाउंडेशनने मुंबई पोलिसांचं रिपोर्टकार्ड जाहीर केलं. यात प्रजा फाउंडेशननं मुंबईत महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये तब्बल 105 टक्क्यांनी वाढ झाल्याचं नमूद केलं. मात्र, मुंबई पोलिसांनी या अहवालावर टीका केली आहे.

ETV Bharat Marathi Desk Updated: 3 hours ago Published: 4 hours ago



मुंबई Praja Foundation Report : मायानगरीतील गुन्हेगारीचं चिंताजनक वास्तव पुढं आणणारा 'मुंबईतील पोलीस यंत्रणा आणि कायदा सुव्यवस्थेची सद्यस्थिती २०२३'

हा अहवाल प्रजा फाउंडेशननं जाहीर केला आहे. या अहवालाची गंभीर दखल घेऊन गृह विभागानं कायदा आणि सुव्यवस्थेतील सुधारणांना प्राधान्य द्यायला हवं, असं या अहवालात नमूद केलं आहे. या

अहवालामध्ये पोलीस यंत्रणेतील सुधारणा, गुन्हेगारीचं स्वरुप आणि प्रमाण, बालकांविरुद्धचे लैंगिक गुन्हे आणि सायबर गुन्हे यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचं समोर आलं आहे. त्यासोबतच पोलीस दलात मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात कमतरता असल्याची बाबदेखील या अहवालातून समोर आली आहे. मात्र, या आकडेवारीवर मुंबई पोलिसांनी आक्षेप घेतला आहे.




प्रजा फाउंडेशनचे अध्यक्ष मिलिंद म्हस्के

सात सुधारणांचे दिशा निर्देश महत्त्वाचे : प्रजा फाउंडेशनचे अध्यक्ष मिलिंद म्हस्के यांनी सांगितले की, "मुंबईमध्ये एकीकडं जागतिक दर्जाच्या सुविधा उभारण्याचं आपलं स्वप्न आहे. तर, दुसरीकडं जीवनाच्या गुंतागुंतीमध्ये समस्यादेखील आहेत. अशा या जागतिक दर्जाच्या शहरातील कायदा आणि सुव्यवस्था चोख राखण्याचं महत्त्व दुर्लक्षित करता येणार नाही. सर्वच प्रकारच्या गुन्ह्यांपासून लोकांना खात्रीनं संरक्षण तेव्हाच मिळेल जेव्हा गुन्हे, नोंदणी तपास कार्य आय प्रक्रियेचं काम कार्यक्षमपणानं होईल. या दृष्टीनं सर्वोच्च न्यायालयानं 'प्रकाश सिंग विरुद्ध भारत सरकार' या २००६ मधील निकालामध्ये नमूद केलेले पोलीस यंत्रणात सुधारणांचे दिशा निर्देश अत्यंत महत्त्वाचे आहेत" असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक संजीव दयाल यांनी 'सेशन कोर्टात निवडण्यासाठी जाणाऱ्या केसचं तपासकार्य यंत्रणा कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणेपासून स्वतंत्र असावं अशा शीर्षकाचा एक स्थायी आदेश २४ मे २०१५ रोजी जारी केला होता. परंतु, आपल्या रेकॉर्डमध्ये स्वतंत्र तपास कक्षाचा डेटा उपलब्ध नसल्याचं मुंबईतील पाच पैकी तीन पोलीस विभागीय कार्यालयांनी आम्हाला कळवलं आहे. सोबतच नागरिकांचा पोलीस व्यवस्थेवरील विश्वास वाढावा यासाठी पोलीस तक्रार प्राधिकरण स्थापन करावं, असे आदेश देखील देण्यात आले होते. त्यानुसार, महाराष्ट्र सरकारनं २५ मे २०१५ रोजी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण तयार केलं. पण, त्याची कोणतीही माहिती आम्हाला माहिती अधिकारात मिळू शकलेली नाही-प्रजा फाउंडेशनचे अध्यक्ष मिलिंद म्हस्के.

महिलांविरोधातील गुन्ह्यात १०५ टक्क्यांनी वाढ : प्रजा फाउंडेशननं जाहीर केलेल्या अहवालानुसार, मुंबईत २०१३ ते २०२२ या १० वर्षात बलात्कार आणि विनयभंगाच्या नोंदवलेल्या गुन्ह्यांमध्ये अनुक्रमे

३९१ वरुन ९०१ म्हणजे जवळपास १०५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२२ मध्ये दाखल एकूण बलात्काराच्या गुन्ह्यांपैकी ६३ टक्के प्रकरणं अल्पवयीन मुलींवरील बलात्काराचे असून ते पोक्सो कायद्याखाली दाखल झाले आहेत. पोक्सो खाली दाखल गुन्ह्यांपैकी ७३ टक्के प्रकरणांचा तपास २०२२ च्या अखेरपर्यंत प्रलंबित होता. २०१८ मध्ये मुंबई पोलीस यंत्रणेतील रिक्त पदांचं प्रमाण २२ टक्के होतं, ते २०२२ पर्यंत वाढून ३० टक्के झालं आहे, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

तपास अधिकाऱ्यांची २२ टक्के पदं रिक्त: गुन्हे तपास अधिकाऱ्यांच्या एकूण मंजूर पदांपैकी २२ टक्के पदं जुलै २०२३ पर्यंत रिक्त होती. २०२२ च्या अखेरपर्यंत एकूण ४४ टक्के केसेसची फॉरेन्सिक चाचणी प्रलंबित होती. मार्च २०२३ अंतिम संबंधित फॉरेन्सिक विभागात ३९ टक्के कर्मचाऱ्यांची कमतरता होती. २०१८ ते २२ यादरम्यान सायबर #गुन्ह्यांमध्ये २४३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. म्हणजेच त्यांची संख्या १३७५ वरून ४७२३ पर्यंत वाढली आहे. याच काळात क्रेडिट कार्ड घोटाळे, फसवणुकीच्या केसेसचं प्रमाण ४७१ वरुन ३४९० इतकं वाढलं आहे. २०२२ मध्ये नोंदवलेल्या सायबर गुन्ह्यांमधील गुन्हेगार सापडण्याचं प्रमाण केवळ ८ टक्के होतं, अशी धक्कादायक माहिती प्रजा फाउंडेशन या संस्थेनं दिली आहे.

अहवालावर मुंबई पोलिसांचा आक्षेप : प्रजा फाउंडेशननं गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत महिलांवरील अत्याचाराची आकडेवारी जाहीर केली. मात्र या आकडेवारीवर मुंबई पोलिसांनी आक्षेप घेतला आहे. मुंबई पोलिसांच्या कायदा आणि सुव्यवस्था विभागाचे सहपोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी ईटीव्ही भारतशी याबाबत माहिती दिली. यात त्यांनी "गेल्या वर्षी भारतीय दंड विधान कलम ३५४ म्हणजेच महिलांच्या छेडछाडी प्रकरणी १९५७ गुन्हे दाखल करण्यात आले होते. तर, यावर्षी १७८२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यावर्षी दाखल झालेल्या १७८२ गुन्ह्यांपैकी ८० टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे" अशी माहिती सत्यनारायण चौधरी यांनी दिली आहे. यावर्षी १७५ गुन्हे कमी दाखल झाले असून १३ टक्क्यांनी गुन्ह्यांची उकल होण्याचं प्रमाण वाढलं आहे. त्याचप्रमाणे भारतीय दंड विधान कलम ५०९ म्हणजेच महिलांच्या विनयभंगाचे गेल्या वर्षी ५८९ गुन्हे दाखल झाले होते, तर यावर्षी ५२८ गुन्हे दाखल झाले आहेत. ही आकडेवारी पाहिल्यास यावर्षी ६१ गुन्हे कमी दाखल झाले आहेत. तर ८७ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. तर गेल्या वर्षी ६७ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात आली होती. म्हणजेच यावर्षी २० टक्क्यांनी गुणांची उकल होण्याचं प्रमाण वाढलं असल्याची माहिती सहपोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी ईटीव्ही भारतशी बोलताना दिली आहे.

Link: https://www.etvbharat.com/marathi/maharashtra/state/mumbai/praja-foundation-report-105-percent-crime-increase-against-women-in-mumbai-said-praja-foundation-report-mumbai-police-reaction/mh20231124085309278278553